# प्रेस नोट

ला.प्र.वि.,अकोला
दि.०६.०६.२०२४.

**आरोपी लोकसेवक दिग्विजय हेमनाथ राठोड वय ५४ वर्ष, व्यवसाय नोकरी जिल्हा उपनिबंधक वर्ग-१, सहकारी संस्था वाशिम. जि.वाशिम यांना ६,००,०००/-रुपयेची लाच स्विकारतांना रंगेहात पकडले बाबत.**

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | दिग्विजय हेमनाथ राठोड वय ५४ वर्ष, व्यवसाय नोकरी जिल्हा उपनिबंधक वर्ग-१, सहकारी संस्था वाशिम. मुळ रा. साई विहार रेसिडेन्सी पाषाण सुस रोड पुणे २१ ह.मु. सिल्वर अपार्टमेंट तिरुपती सिटी फ्लॅट नंबर ५०६ वाशिम जिल्हा जि. वाशिम |
| लाचेची रक्कम | ६,००,०००/-रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे प्राथमिक चौकशीचा अहवाल तक्रारदार यांचे बाजुने अनुकुल पाठविण्या करीता |
| सापळा अधिकारी | सचिन सावंत, पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला. |

दि. ०४.०६.२०२४ रोजी तक्रारदार पुरुष वय ४६ वर्ष रा.मंगरुळपिर जि.वाशिम यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे प्राथमिक चौकशीचा अहवाल तक्रारदार यांचे बाजुने अनुकुल पाठविण्यासाठी आलोसे दिग्विजय राठोड, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वाशिम यांनी तक्रारदार यांना ९,०००,०००/-रुपये लाचेची मागणी करुन यापुर्वी तक्रारदार यांचे कडुन २,५०,०००/-रुपये स्विकारले आहेत व उर्वरित ६,५०,०००/-रुपये लाचेसाठी तक्रारदार यांना तकादा लावुन मागणी करत असल्याबाबत तक्रारदार यांनी दि.०४.०६.२०२४ रोजी ॲटी करप्शन ब्युरो अकोला येथे तक्रार दिल्याने नमुद तक्रारीच्या अनुषंगाने दि.०६.०६.२०२४ रोजी पडताळणी कारवाई केली असता आरोपी लोकसेवक यांनी तडजोडीअंती तक्रारदारास ६,००,०००/-रुपये लाच रक्कम मागितल्याचे निष्पन्न झाले त्यावरुन सापळा कारवाई आजमावली असता आलोसे यांनी तक्रारदार यांचे कडुन लाच रक्कम ६,००,०००/-रुपये स्विकारल्याने आलोसे यांना ताब्यात घेवुन भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये वाशिम शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक, श्री.मारुती जगताप, अपर पोलीस अधिक्षक श्री. अनिल पवार ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक सचिन सावंत, नरेंद्र खैरनार पोलीस अंमलदार दिगंबर जाधव,अभय बावस्कर, संदीप ताले, निलेश शेगोकार ला.प्र.वि. अकोला यांनी केली.

शासकीय लोकसेवकाने, खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो, अकोला दुरध्वनी क्रमांक ०७२४/२४२०३७०, टोल फ्रि.नं.१०६४ यावर संपर्क साधण्याचे आवाहन सचिन सावंत, पोलीस निरीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अकोला यांनी केले आहे.

(सचिन सावंत)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला.